गांवकरी
www.gavakari.net
23 May 2025 - Page 11



# के. के. वाघ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अखेरच्या वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पसमध्ये प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन केले जात असते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १६५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी ५५० हून अधिक विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये निवड झालेली आहे. विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळालेले आहे. या विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार केला जात असतो.

गेल्या आठवड्यात के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे निवड झालेल्या ८८ विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या हस्ते औरंगाबादकर हॉल येथे सत्कार झाला. त्यामध्ये ५४ विद्यार्थी व ३४ विद्यार्थिनींचा समावेश आहे. याप्रसंगी विभागप्रमुख डॉ. एस. एम. कमलापूर, डॉ. पी. बी. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. आर. के. मुंजे, डॉ. सुनील कुटे, डॉ. व्ही. सी. बागल व डॉ. पी. जे. पवार हे उपस्थित होते. जोश सॉफ्टवेअर, इन्फोसिस, आयबीएम, टेक महिंद्रा, एचएसबीसी, केपीआयटी, विंजित आणि एनसीडीईएक्स यांसारख्या अनेक कंपन्यांचा समावेश असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के.शहाबादकर यांनी दिली.